SNDT Women's University
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

ऑफि.जन.१ / NC-50 / २०२३–२४/1036

०४ सप्टेंबर, २०२३.

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून नवीन विषय / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी / पाठयक्रम सुरू करावयाचे असल्यास.........

**परिपत्रक:**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम १०९ व महाराष्ट शासन निर्णय दिनांक १३/९/२०१७ मधील तरतुदीच्या अनुषंगाने , श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाशी संलग्नीत संस्था / महाविद्यालयांना नवीन विषय / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी / पाठयक्रम सुरू करावयाचे असेल अशा, निकषांची पूर्तता करणाऱ्या इच्छुक महाविद्यालय/ संस्थांकडून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता केवळ ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

संस्था / महाविद्यालयांनी, दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ सायंकाळी ५.०० वा.पर्यंत आपले प्रस्ताव https://sndtwuonline.org.in या लिंकवर क्लिक करून ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत व प्रस्तावाच्या दोन प्रति दिनांक ०५ ऑक्टोंबर, २०२३ सायंकाळी ५.०० पर्यत संलग्नता विभाग, मुंबई ४०० ०२० यांच्याकडे जमा कराव्यात.

विद्यापीठाच्या https://sndt.ac.in/downloads/affiliation या संकेतस्थळावर या विषयाचे परिपत्रक, नमुना अर्ज, शासन निर्णय, संलग्नीकरण शुल्क व इतर माहिती उपलब्ध आहे.

अर्ज दाखल करण्यापूर्वी पात्रता निकषांची (Eligibility Criteria) पूर्तता होत असलेबाबत खातरजमा करावी. निकषांची पूर्तता न करणाऱ्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

विहित दिनांकानंतर व वेळेनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

5/9/23.

(डॉ. मेधा तापिआवाला)
अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अति.भार)

# Eligibility Criteria

1. If the college has applied for many programmes, permissions can be given for maximum three programmes at a time.
2. At least one batch of UG should pass out before giving a PG programme.
3. At least one batch of the existing program should pass out before giving a new program.
4. No PG programme to be given if the institute is not offering the UG Programme in that subject.
5. If the program is not offered by the University it cannot be given.
6. For additional division a trend of no. of applications in the last year has to be established indicating requirement of additional division. No. of applications should be 150% of the intake.
7. A programme may be given approval other than the programmes which require permission from Apex bodies.
8. If the institution is already established for more than 5 years then "NAAC Accreditation" will be mandatory.

P.S. Wakpainjan
14/9/17

(Dr. Pradnya Wakpainjan)
Affiliation Section (Addl. Charge)

MR
14/9/17

**SHREEMATI NATHIBAI DAMODAR THACKERSEY**
**WOMEN'S UNIVERSITY**
**MUMBAI – 400020.**

Affi.Gen.1/Circular/ 2022-23 / 2595

13 January, 2022

**CIRCULAR:**

To all principal/In-charge principal's of Affiliated Colleges,

With reference to University circular dated 10th January, 2023 regarding to invite application for New Faculty/Course/Subject/Addl. division from the A.Y. 2023-24 we would like to bring to your kind notice that, as per resolution passed by Board of Deans in its meeting dated 13.01.2023 following amendments has been approved in the Eligibility Criteria for applying New Course is as below

Earlier of Eligibility criteria point no. 3 is:
**"At least one batch of existing programme should pass out before giving a new programme"**

Now amendment made in point no. 3 of Eligibility Criteria is as below:
**"The existing college/New college permitted to apply for maximum 3 courses in first three years only"**

The eligible Colleges shall apply according to new amendment in prescribed time limit.

(Sd/-)
Dr. Pradnya Wakpainjan
Affiliation Section (Addl. Charge)

**सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्यांना मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१७

**वाचा :-** १) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.
२) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(३०१/०९)/मशि-४, दि.२५.९.२००९.
३) शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१०/(१९३/१०)/मशि-४, दि.३०.१०.२०१०.
४) शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१२/(२४७/१२)/मशि-४, दि.२.९.२०१३.

**प्रस्तावना :-**

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६" अंमलात आणलेला आहे. सदर अधिनियमातील कलम १०९(४) नुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी कालबद्ध तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, या तरतुदीस अनुसरुन अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कार्यपद्धती निश्चित करावी, अशी तरतूद कलम १०९ (९) अन्वये करण्यात आली आहे. सदरहू तरतुदींच्या अनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी कार्यपद्धती व निकष सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र. २, ३, ४ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय:-**

१. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीसाठी मंजुरी देण्यासाठी पुढे विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**कार्यपद्धती :-**

१.१ विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वत्र समान वाटप होण्यासाठी "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६" च्या कलम १०७ मधील तरतुदीनुसार एक सम्यक योजना (Perspective Plan) तयार करावी.

१.२ सर्व विद्यापीठांनी पाच वर्षांचा बृहत आरखडा करावा, त्यामध्ये ज्या जिल्ह्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे, नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ /दुर्गम भागासाठी सर्वोच्च प्राथम्य द्यावे व त्या प्राथम्यक्रमानुसार व तद्नंतर सर्वसाधारण याप्रमाणे त्या-त्या शैक्षणिक वर्षासाठी विशिष्ट एवढ्याच नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीच्या (व्यावसायिक (AICTE व NCTE मंजुरी देत असलेले) अभ्यासक्रम सोडून) मंजुरीच्या प्रस्तावांची शिफारस करावी.

१.३ सदर सम्यक योजना महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडून मान्य करुन घ्यावी.

१.४ सम्यक योजनेस अनुसरुन विद्यापीठांनी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठी वार्षिक योजना तयार करावी.

१.५ वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठीचे बिंदु निश्चित केल्यानंतर सर्व अकृषी विद्यापीठांनी बृहत आराखडयातील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. बृहत आराखडयाबाहेरच्या ठिकाणासाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा व तसे स्वीकारु नयेत.

१.६ नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या सुरु करण्यास इच्छूक संस्थांनी “महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६” च्या कलम १०९ (४) (क) मधील तरतुदीनुसार सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अर्जाच्या नमुन्यात संबंधित विद्यापीठाकडे अर्ज दाखल करावेत. त्यासोबत परिशिष्ट “ब”मध्ये नमूद केलेली कागदपत्रे जोडण्यात यावीत.

१.७ विद्यापीठांनी ऑनलाईन (Online) पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज स्वीकारावेत. अर्जात भरण्यात आलेली माहिती व त्यासोबत जोडणे आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी एक तपशीलसूची तयार करुन आवश्यक बाबींची पूर्तता करणारेच अर्ज स्वीकारावे. ज्या विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने संगणकप्रणाली विकसित करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठांनी पुढील एका वर्षात अर्ज स्वीकारण्याची संगणकप्रणाली विकसित करणे अनिवार्य राहील.

१.८ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरिता आवश्यक तेवढ्या छाननी समित्या विद्यापीठांचे कुलगुरु नियुक्त करतील.

१.९ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट “ब” मध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार करुन छाननी समिती त्यांचा अहवाल १५ ऑक्टोबर पर्यंत कुलगुरुंना सादर करतील.

१.१० ज्या संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस / अर्जदारास २० ऑक्टोबर पर्यंत त्रुटी कळविण्यात येतील.

१.११ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी ३१ ऑक्टोबरपर्यंत विद्यापीठाकडे त्रुटीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१.१२ त्रुटीच्या पूर्ततेच्या अर्जाची छाननी समितीकडून छाननी करुन त्यासहीत छाननीत पात्र झालेल्या अर्जासह अहवाल १५ नोव्हेंबरपर्यंत अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांना सादर करण्यात येईल.

१.१३ संबधित विद्यापीठाचे कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ज्ञ समिती गठित करतील. सदर तज्ज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांच्या अंतर्भाव असणार नाही. सदर तज्ज्ञ समितीने १५ डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष भेटी देऊन नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीसाठी संबंधित संस्थांची सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट “ब” मध्ये विहित करण्यात आलेल्या सूचीनूसार तयारी आहे किंवा कसे, याबाबत काटेकोर परिक्षण करुन त्यांचा अहवाल व्हिडीओ छायाचित्रणासह १५ जानेवारीपर्यंत अध्यक्ष, अधिष्ठता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करण्यात येईल. सदर पायाभूत सोयीसुविधा पूर्ण न करणाऱ्या संस्थांची शिफारस विद्यापीठ करणार नाही.

१.१४ कुलगुरुंकडून संबंधित पात्र संस्थांना २५ जानेवारी पर्यंत पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

१.१५ अपात्रता कळविलेल्या संस्था १५ फेब्रुवारीपर्यंत त्याविरुद्ध विद्यापीठाकडे अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर (गरजेनुसार तज्ज्ञ समिती पाठवून अहवाल घेऊन) १५ मार्चपर्यंत कुलगुरु निर्णय देतील.

१.१६ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजुरीच्या शिफारशीसह विद्यापीठाकडून प्रपत्र-“ब” सह शासनाकडे दिनांक १ एप्रिलपर्यंत सादर करण्यात येतील.

१.१७ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या व शासनस्तरावरील छाननीअंती पात्र ठरलेल्या प्रस्तावावर शासनाकडून १५ जूनपर्यंत परवानगी कळविण्यात येईल.

१.१८ वरील तारखांच्या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, उपरोक्त तारखांना सार्वजनिक / स्थानिक सुट्टी असल्यास त्याच्या पुढील कार्यालयीन दिवशीची तारीख ही अंतिम तारीख असेल.

१.१९ वरील परि. १.८ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. १.१३ मध्ये विहित केलेली तज्ज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाचा नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा व अतिरिक्त तुकडी वाढ यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल, याची खातरजमा करतील.

२. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरी देण्यासाठी पुढे विहित केलेल्या निकषांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**निकष :-**

२.१ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम १०९(६) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विद्यापीठ नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठीचा उच्च शिक्षणाच्या विद्यमान महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा अर्ज, जर -

**(क)** ते, अधिस्विकृती अधिकरणांच्या (NAAC) मानांकनानुसार अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असले तरीसुद्धा, एकतर राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्विकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाकडून (NBA) अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती करण्यात आली नसतील ; आणि

**(ख)** राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तींचे ते अनुपालन करीत नसतील तर, राज्य शासनाकडे पाठविणार नाही.

त्याचप्रमाणे, ज्यांची यापूर्वीची महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांचेबाबतीत पुढील पूर्तता नसलेल्या संस्थांचे अर्ज शासनाकडे शिफारशीत करु नयेत.

**अ)** ज्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्यासहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारामधून भरलेली नसतील तर.

**ब)** यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब, क, ड ची पूर्तता करत नसतील तर,

२.२ शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्यांची मान्यता ही कायम विनाअनुदानित तत्वावर राहील.

२.३ नवीन पाठ्यक्रमाची शिफारस करताना अशा अभ्यासक्रमास शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळ यांची मान्यता आवश्यक असल्यास त्यांच्या मान्यतेशिवाय असा पाठ्यक्रम शिफारशीत करण्यात येऊ नये.

२.४ ज्या महाविद्यालयाकरिता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, त्या महाविद्यालयामध्ये अस्तित्वात असलेल्या अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकड्यांना शासन मान्यता आहे, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत, याची खातरजमा केल्यानंतरच प्रस्ताव शिफारशित केले जावेत.

२.५ ज्या महाविद्यालयाकरिता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, त्या वाढीव अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीकरीता शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार वाढीव भौतिक व मूलभूत सुविधा उपलब्ध असल्याची प्रमाणित कागदपत्रे महाविद्यालयांनी अर्जासोबत जोडणे आवश्यक असून, विद्यापीठाने ही बाब प्रमाणित करावी.

२.६ ज्या महाविद्यालयाकरीता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजूर करण्यात आलेली आहे, त्याकरिता विहित निकषांप्रमाणे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त केले असल्याचे प्रमाणपत्र विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी पुढील ०६ महिन्यांमध्ये शासनास सादर करावे.

३. विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना त्यात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी असे वर्गीकरण केलेले असेल.

४. विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना प्रस्ताव विहित केलेल्या निकषांची पूर्तता करीत असल्याची खात्री करावी. विहित निकषांची पूर्तता होत नसतानासुद्धा प्रस्ताव शासनस्तरावर विद्यापीठाकडून शिफारशित केले गेल्यास, अशा शिफारस केलेल्या प्रकरणी शासनास नाहक न्यायालयीन प्रकरणास सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे विहित निकषांची पूर्तता करीत नसताना प्रस्ताव शासनास सादर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यापीठाची पर्यायाने प्र.कुलगुरु तथा अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांची राहील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१२१३०११३४८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(रोहिणी भालेकर)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी.
४) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव.
५) अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहायक.
६) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
७) विशि-३, विशि-४ कार्यासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
८) निवड नस्ती (मशि-४)

## * परिशिष्ट-अ *

### नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी

<table>
<tr><td>१.</td><td>संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता :<br>(दुरध्वनी क्रमांकासह)</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td>२.</td><td>महाविद्यालयाचे नाव आणि पूर्ण पत्ता :</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td>३.</td><td>ज्या महाविद्यालयात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करावयाची आहे, त्या ठिकाणाची लोकसंख्या :</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td>४.</td><td>महाविद्यालयात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करावयाचे सत्र :</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td rowspan="5">५.</td><td rowspan="5">अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी अस्तित्वात असल्यास त्याचा तपशिल (मुळ तुकडी अनुदानावर असेल तर तसा स्पष्ट उल्लेख करावा) :<br>तुकड्यांचा प्रकार नमूद करण्यात यावा. (अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित)</td><td></td><td>✓</td><td>विषय</td><td>विद्यार्थी संख्या</td></tr>
<tr><td>विद्याशाखा</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>विषय</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>तुकडी</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>६.</td><td colspan="5">आवेदन शुल्क रुपये-----/-, धनाकर्ष क्र.----------------<br>दिनांक ------------------ बँकेचे नाव--------------------<br>(धनाकर्ष कुलसचिव,-------------------------विद्यापीठ, यांचे नावे असावा.)</td></tr>
<tr><td>७.</td><td colspan="5">महाविद्यालयात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करावयाच्या विद्याशाखेचा तपशील :<br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शाखा</th><th>अभ्यासक्रम</th><th>अध्यापनाचे माध्यम</th><th>अध्यापनाचे विषय</th></tr>
<tr><td>१.</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२.</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>८.</td><td colspan="5">संस्थेचा पंजीयनाचा क्रमांक -------- व दिनांक -----------</td></tr>
<tr><td>९.</td><td colspan="5">संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबींसंबंधी तरतुद असल्यास त्या तरतुदींच्या कलम क्र. व तद्नुसार नविन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासंबंधीचा संस्थेचा ठराव क्र.----- व दिनांक --------</td></tr>
<tr><td>१०.</td><td colspan="5">महाविद्यालयात सुरु करणार असलेल्या प्रस्तावित नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी महाविद्यालयाच्या १५ कि.मी. परिसरातील इतर महाविद्यालयात शिकविले जात असल्यास मागील ०३ वर्षांचा नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीच्या वस्तुस्थितीचा महाविद्यालयांच्या नावासह तपशील :<br>(जागा कमी पडल्यास स्वतंत्र वेगळया कागदावर पुरविण्यात यावी.)</td></tr>
</table>

<table>
<tr><td>११.</td><td>आपण सुरु करणार असलेल्या नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीमुळे व उल्लेखित परिसरातील इतर महाविद्यालयाशी अवास्तव स्पर्धा निर्माण होईल काय ? --------------------------------</td></tr>
<tr><td>१२.</td><td>निरनिराळ्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या :
<table>
<tr><th>कला</th><th>वाणिज्य</th><th>विज्ञान</th><th>विधि</th><th>इतर</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१३.</td><td>१५ कि.मी. परिसरातील अस्तित्वात असलेल्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची मागील ०३ वर्षांची पुढील संदर्भात माहिती द्यावी :
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता</th><th>वर्ष</th><th>उच्च माध्यमिक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या</th><th>उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या</th><th>उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी</th></tr>
<tr><td>१.</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१४.</td><td>कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या नविन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाची आहे, ते ठिकाण १२ वी च्या परिक्षेचे केंद्र आहे काय ? ---------------------</td></tr>
<tr><td>१५.</td><td>केंद्र असल्यास तेथून १२ वी च्या मार्च व ऑक्टोबरच्या परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कला, वाणिज्य, विज्ञान शाखानिहाय संख्या -----------------------------------------------------</td></tr>
<tr><td>१६.</td><td>अ) संस्थेद्वारा चालविल्या जाणाऱ्या शाळा व महाविद्यालये यांचा तपशिल-----------------------<br>ब) सदर शाळा व महाविद्यालयांची मान्य प्रवेश क्षमता, प्रत्यक्ष प्रवेशित व परिक्षेस बसलेले विद्यार्थी ------------</td></tr>
<tr><td>१७.</td><td>अ) महाविद्यालयासाठी वापरल्या जावयाच्या इमारतीच्या खोल्यांची संख्या व आकार --------------<br>ब) सदर इमारत खोल्यांमध्ये सध्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा इतर अभ्यासक्रमाचे वर्ग भरतात काय? ------------- ------- असल्यास त्याचा तपशील ------------------------</td></tr>
<tr><td>१८.</td><td>अर्ज केलेल्या वर्षातील ३१ मार्चला असलेली संस्थेची आर्थिक स्थिती :-<br>(अ) स्थावर मालमत्ता<br>(ब) जंगम मालमत्ता<br>(क) बँकेतील रोख<br>(ड) बँकेचे वा इतर कर्ज</td></tr>
<tr><td>१९.</td><td>वरील उल्लेखित बाबींशिवाय महाविद्यालयाच्या आकस्मिक व अनाकस्मिक खर्चासाठी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदींचा तपशील : -----------------------------------------------</td></tr>
</table>

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**अध्यक्ष**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**सचिव**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

*** परिशिष्ट-ब ***

**संस्थेचे नाव :-** **विद्यापीठाचे नाव :**

**ठिकाण :-** **विद्याशाखा :-**

| अ.क्र. | तपासणी सूची | पुर्ततेचा "तपशिल" (होय/नाही) | जोडलेल्या कागदपत्रांचा पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संस्थेचा विहित नमुन्यात अर्ज. | | |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | | |
| ३. | चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ४. | घटनेची साक्षांकित प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची प्रत. | | |
| ६. | संस्थेच्या फिक्स डिपॉजिटची प्रमाणित प्रत.<br>नविन अभ्यास पाठ्यक्रम - रु.५.००लाख<br>विषय - रु.२.००लाख<br>विद्याशाखा - रु.५.००लाख<br>अतिरिक्त तुकडी - रु.३.००लाख | | |
| ७. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | | |
| ८. | संबंधित राष्ट्रीयकृत शेड्युल बँकेत ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय न काढणेबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | | |
| ९. | शासनाचे कायम विनाअनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत महाविद्यालयाचा नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु.१००/- स्टँपपेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १०. | **१) स्वत:ची जागा –**<br>**अ)** "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**ब)** "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परीसरात किमान १ एकर अकृषक जागा.<br>**क)** "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**ड)** "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परीसरात किमान २ एकर अकृषक जागा. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **इ)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्राची प्रमाणित प्रत.<br>**२) भाडयाची जागा - अ)** "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत.<br>**ब)** "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची " प्रत.<br>**क)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत. | | | |
| ११. | **अ) इमारत (स्वत:ची)** - संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे. (सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये सर्वसाधारण वर्गखोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील जोडला आहे, तो खालील रकान्यात त्यांच्या नावासमोर नमूद करावा. तसेच, वर्ग खोल्यांची संख्याही नमूद करावी.) | | | |
| | **१) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत :** | **चौ.फु.** | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष<br>१.२ कार्यालय<br>१.३ इलेक्ट्रॉनिक्स/संगणक प्रयोगशाळा<br>१.४ रसायनशास्त्र प्रयोगशाळा<br>१.५ पदार्थविज्ञान प्रयोगशाळा<br>१.६ जिवशास्त्र प्रयोगशाळा<br>१.७ ग्रंथालय<br>१.८ लेडीज रुम<br>१.९ रेकॉर्ड रुम<br>१.१० नॅक रुम<br>१.११ स्टाफ रुम<br>१.१२ सभागृह<br>१.१३ मोठे व्याख्यान कक्ष<br>१.१४ स्वच्छतागृह (२० विद्यार्थ्यामागे ०१ स्वच्छतागृह) महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व प्रसाधने<br>१.१५ व्हरांडा<br>१.१६ एन.सी.सी.रुम<br>१.१७ एन.एस.एस.रुम<br>१.१८ वाहनतळ (दुचाकी वाहनांसाठी) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **२) २.१ पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती)** | | | |
| | **२.२** वीज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | | |
| | **२.३** ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | | |
| | **३)** होस्टेल सुविधा / परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | | |
| | **“ब”) इमारत भाडयाची :** (नोंदणीकृत भाडेकरार) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे. (सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये सर्वसाधारण वर्गखोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील जोडला आहे, तो खालील रकान्यात त्यांच्या नावासमोर नमूद करावा. तसेच, वर्ग खोल्यांची संख्याही नमूद करावी.) | | | |
| | **१) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत** | **चौ.फु.** | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष<br>१.२ कार्यालय<br>१.३ इलेक्ट्रॉनिक्स/संगणक प्रयोगशाळा<br>१.४ रसायनशास्त्र प्रयोगशाळा<br>१.५ पदार्थविज्ञान प्रयोगशाळा<br>१.६ जिवशास्त्र प्रयोगशाळा<br>१.७ ग्रंथालय<br>१.८ लेडीज रुम<br>१.९ रेकॉर्ड रुम<br>१.१० नॅक रुम<br>१.११ स्टाफ रुम<br>१.१२ सभागृह<br>१.१३ मोठे व्याख्यान कक्ष<br>१.१४ स्वच्छतागृह (२० विद्यार्थ्यांमागे ०१ स्वच्छतागृह) महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व प्रसाधने<br>१.१५ व्हरांडा<br>१.१६ एन.सी.सी.रुम<br>१.१७ एन.एस.एस.रुम<br>१.१८ वाहनतळ (दुचाकी वाहनांसाठी) | | | |
| | **२) २.१ पाणी सुविधा (पाणीपट्टी पावती)** | | | |
| | **२.२** वीज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | | |
| | **२.३** ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | | |
| | **३)** होस्टेल सुविधा / परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | | |
| १२. | १२(अ) व (ब) मधील (१) व (२) साठी फर्निचर किंवा त्यासाठी किमान रु.५.०० लक्ष शिल्लक असल्याबाबतचा पुरावा. | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | जो पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरु करावयाचा आहे ग्रंथालयात पुस्तकाची सुविधा (किमान १०० पुस्तके प्रत्यक्षात हवीत) | | |
| १४. | प्रथमत: महाविद्यालय भाड्याच्या इमारतीत सुरु केले असेल तर प्रथम संलग्निकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजुर झाले आहे, त्या ठिकाणी स्वत:चे इमारतीमध्ये स्थलांतरीत करत असल्याबाबतचे हमीपत्र. | | |
| १५. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम १०९(६) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे ज्या संस्थेची यापुर्वीचे महाविद्यालय अस्तित्वात आहे अशा संस्थेने नविन महाविद्यालयाची मागणी केल्यास पुर्वीच्या महाविद्यालयाचे नॅक/एनबीए मूल्यांकन अथवा पूनर्मूल्यांकन असणे आवश्यक आहे. | | |

प्रपत्र-"अ"

परिशिष्ट ब मधील अ.क्र. १२ (अ) व (ब) साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ

| अ. क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकुण क्षेत्र | कला/विधी/ शिक्षण शाखा | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला, वाणिज्य, विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २०*२५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३०*२० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २०*३० | ६०० | -- | -- | ६००(०) | -- | ६००(०) | ६००(०) | ६००(०) |
| ४) | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०*४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ५) | पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा | १ | ३०*४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ६) | जिवशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०*४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ७) | ग्रंथालय | १ | २०*३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ८) | एनसीसी रुम | १ | २०*१५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| ९) | एन.एस.एस.रुम | १ | २०*१५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| १०) | लेडीज रुम | १ | १०*१५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ११) | रेकॉर्ड रुम | १ | १०*१५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| १२) | नॅक रूम | १ | १०*१५ | १५० | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) |
| १३) | स्टाफ रूम | १ | २०*३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १४) | सभागृह | १ | ४०*३० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| १५) | मोठे व्याख्यान कक्ष | ३/६/९ | | ९०० | २७०० | २७०० | २७०० | ५४०० | ५४०० | ५४०० | ८१०० |
| १६) | टॉयलेट ब्लॉक | ४ | १०*१५ | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १७) | व्हरांडा | १ | किमान ५ फुट रुंद | | २१०० | २४०० | ३३०० | ३००० | ३८०० | ४१०० | ४६५० |
| | **एकूण (किमान आवश्यक क्षेत्रफळ)** | | | **१०२५०** | **९२००** | **९५००** | **१४०००** | **१२८००** | **१७२००** | **१७५००** | **२०७५०** |

* **व्यावसायिक महाविद्यालयासाठी स्वतंत्र शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे असल्यास अशा शिखर संस्था / केंद्रिय नियामक मंडळाच्या नियमानुसार त्यांनी विहित केलेल्या आवश्यक भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचे निकष त्यांना लागू राहतील.**

* प्रपत्र-ब *

| क्र. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रस्तावित नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी विद्याशाखेचा तपशिल | विद्यापीठांनी केलेली शिफारस | संस्थेने महाविद्यालयांसाठी आवश्यक विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध केल्या आहेत काय? असल्यास, त्याचा तपशिल | संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे. | ज्या तालुक्यामधील महाविद्यालयात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मागितली आहे त्या तालुक्यातील महाविद्यालयात अस्तित्वात असणाऱ्या नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीवर विपरित परिणाम होईल किंवा कसे, | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांची नावे व महाविद्यालयांमधील अंतर | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांतील विद्याशाखेंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या विषयाचे गट (व्यावसायिक अभ्यासक्रमांची स्वतंत्र माहिती द्यावी) | गटनिहाय विद्यार्थी संख्या (व्यावसायिक अभ्यासक्रमाची स्वतंत्र माहिती द्यावी | तालुक्यामध्ये महाविद्यालय शाळांमधुन १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्याशाखा निहाय विद्यार्थ्यांची संख्या | मागील वर्षी किती विद्यार्थी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रवेशापासून वंचित राहिले | नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यास परवानगी द्यावी किंवा कसे याबाबतचे विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | १.<br>२.<br>३.<br>४.<br>५.<br>६.<br>७.<br>८.<br>९.<br>१०.<br>११.<br>१२. | | | | | | | + | |

सुचना : संस्थेने रकाना क्र.४, ५ व १३ सोडून इतर माहिती अचूक भरावी. त्यातील चुकांची जबाबदारी संस्थेची राहील.

मूळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष
(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)

मूळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ, संबंधित अकृषि विद्यापीठ